Estd: 1962
'B' Accredited by NAAC

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठ निधीमधून भरावयाच्या वर्ग ४ मधील 'माळी' पदांच्या प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.०३/२०१९ दि.८/३/२०१९ च्या अनुषंगाने लेखी परीक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना

१. परीक्षेसाठी येताना विद्यापीठामार्फत परीक्षेसाठी बोलविण्यात आलेले पत्र आणावे. मुळ शासकीय ओळखपत्र (पॅनकार्ड, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, मतदान ओळखपत्र इ.) लेखी परीक्षेवेळी, आणणे आवश्यक आहे.

२. उमेदवारांनी लेखी परीक्षेच्या वेळेपुर्वी एक तास अगोदर परिक्षेच्या ठिकाणी उपस्थित रहावे.

३. परीक्षा OMR या उत्तरपत्रिकेतून द्यावयाची असल्याने उमेदवारांनी सोबत काळया शाईचे बॉल पेन आणणे आवश्यक आहे.

४. यापुर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे व परीक्षा पध्दतीप्रमाणे एकूण ५० गुणांची ( OMR ) लेखी परीक्षा होईल.

५. लेखी परीक्षेचा कालावधी ६० मिनीटांचा राहील.

६. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारांची नावे विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेत स्थळावर recruitment सदरामध्ये तसेच मुख्य इमारतीच्या प्रवेश व्दाराजवळील नोटीस बोर्डवर जाहीर करण्यात येतील.

**७.** लेखी परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांपैकी भरावयाच्या पदांनुसार १ : ५ या प्रमाणात उमेदवारांची संख्या गुणवत्तेनुसार मर्यादीत करण्यात येईल व यांनतर त्यांच्या कागदपत्रांची छाननी करणेत येईल. सदर छाननीमध्ये कागदपत्रांच्या अभावी/अपु—या/चुकीच्या माहितीमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उमेदवार अपात्र झाल्यास सदरचा उमेदवार पुढील प्रक्रियेसाठी बाद ठरवण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**९.** उमेदवाराने जाहीरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. किमान अर्हता प्राप्त केली म्हणून अथवा लेखी परिक्षेत केवळ उत्तीर्ण झाले म्हणून प्रात्यक्षिक परिक्षेस बोलवण्यास पात्र असणार नाही.

१०. लेखी परीक्षेनंतर प्रात्यक्षिक परिक्षेच्या प्रक्रिये दरम्यान नव्याने कोणत्याही प्रकारची कागदपत्रे मुळ अर्जासोबत जोडण्या करता स्वीकारले जाणार नाहीत. तसेच याबाबत कोणताही पत्र व्यवहार करू नये.

११. गुणवत्ता यादीमधील उमेदवार कोणत्याही कारणास्तव अपात्र झाल्यास गुणवत्ता यादीमधील पुढील उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बोलविण्यात येईल.

१२. संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या याद्या या प्राथमिक स्वरुपात केवळ लेखी परिक्षेसाठी पात्र उमेदवारांच्या आहेत. याची नोंद घ्यावी.

**१३. कोव्हीड १९ विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी जाहीर केलेल्या उपाययोजनांचे काटेकरपणे पालन करण्यात यावे. (मास्कचा वापर करणे, सॅनिटराईजने हात धुणे, सामाजिक अंतर ठेवणे, इत्यादी)**

**सदर लेखी परीक्षेसाठी बैठक क्रमांकासह उमेदवारांची यादी सोबतप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे, याची संबंधित उमेदवारांनी नोद घ्यावी.**